॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. १**

जळगाव दि. २४ (          ) महिलांनी कार्यालयात काम करताना वेळेचे व्यवस्थापन करुन स्वत:मध्ये असलेल्या क्षमता ओळखाव्यात, प्रसंगी जे काम जमणारे नाही ते नाही म्हणायला शिकायला हवे म्हणजे कोणतेही ताण-तणाव येणार नाहीत असे प्रतिपादन मानसशास्त्राच्या अभ्यासक डॉ.अर्पणा अष्टपुत्रे यानी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील `मनस्विनी` या महिला समुहाच्या वतीने सोमवार, दि. २४ सप्टेंबर रोजी डॉ.अष्टपुत्रे यांचे ताण-तणावाचे व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते तर डॉ.रत्नमाला बेंद्रे या अध्यक्षस्थानी होत्या. डॉ.अर्पणा अष्टपुत्रे म्हणाल्या की, ताण कमी करण्यापेक्षा ताणाला आपण आमंत्रित करत असतो. काही ताण नकोसे असतात तर काही ताण हवे असतात. स्त्रिया अधिक भावनिक असतात कारण त्यांचा मेंदू त्याप्रमाणे विकसित होत असतो. वेळेचे व्यवस्थापन, नाही म्हणायला शिकणे, कामाची विभागणी, स्वत:मधील क्षमतांची ओळख या गोष्टींकडे अधिक लक्ष दिले तर ताण येणार नाही. चिडचिड करण्यापेक्षा काम नाही झाले तरी हसून ते काम स्वीकारले तर जास्त चांगले असते. घरात मुलांशीही अधिक संवाद असायला हवा. त्याच त्या सूचना मुलांना देवू नका. ज्या गोष्टीमुळे त्रास होतो त्याला पर्याय शोधण्याचा प्रयत्न करा असेही त्या म्हणाल्या.

प्रा.माहुलीकर यांनी यावेळी मनस्विनी ग्रुपमुळे विद्यापीठातील महिलांना स्वतंत्र मंच मिळाला असून यामुळे महिलांच्या व्यक्तिमत्व विकासाला निश्चितच फायदा होणार असल्याचे मत व्यक्त केले. डॉ.रत्नमाला बेंद्रे यांनी महिलांनी सादर केलेल्या कलेचे यावेळी कौतुक केले. व्याख्यानाच्या आधी मनस्वीनीच्या सुरेखा पाटील, चित्रांगा चौधरी, संगीता पुनाजी पाटील, संगीता सुभाष पाटील, प्रिती सोनी,निता शिंदे,माया जाधव, कल्पना गावंडे, शितल कढरे या महिलांनी व सपना बाविस्कर, निशा पाटील या विद्यार्थिनींनी `महाराणीचा दरबार` ही नाटिका तसेच बहिणाबाई चौधरी यांच्या दोन गीतांचे सादरीकरण केले. संगीता सुभाष पाटील यांनी बहिणाबाई साकारल्या. प्रा.पवित्रा पाटील, पुष्पा पाटील, कल्पना गावंडे, मनिषा कंडारे, सुशिला शिंदे यांनी देखील वैयक्तिक सादरीकरण केले. वैशाली शर्मा व चित्रा कोळी यांनी प्लास्टीक हटाव, पर्यावरण बचाव या उपक्रमाचे महत्व सांगून उपस्थित महिलांना कापडी पिशव्यांचे वाटप केले.

समाजकार्य विभागात शिकणाऱ्या निशिगंधा सोळंखे या विद्यार्थिनीला संयोजक मनस्विनीच्या वतीने पाच हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश यावेळी प्रा.माहुलीकर यांच्या हस्ते देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेखा पाटील व चित्रांगा चौधरी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय संगीता पुनाजी पाटील यांनी करुन दिला. माया जाधव यांनी सुत्रसंचालन केले तर निता शिंदे यांनी आभार मानले.

..२..

**बातमी क्र. २**

जळगाव दि. २४ ( ) एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र या विषयात या वर्षापासून विद्यापीठातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस प्रा.आर.एम.पै सुवर्णपदक दिले जाणार असून या सुवर्णपदकासाठी दोन लाख रुपयांचे धनादेश कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय किर्तीचे वनस्पतीशास्त्रज्ञ असा लौकिक असलेले प्रा.आर.एम.पै हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील माजी विभागप्रमुख होते. इंडियन सायन्स काँग्रेस (वनस्पतीशास्त्र विभाग) आणि इंडियन बॉटनिकल सोसायटीचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले आहे. प्रा.पै यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे येथील येथील डॉ.डी.ए.पाटील यांनी पीएच.डी.पदवी प्राप्त केली होती. डॉ.पाटील व त्यांचे सहसंशोधक प्राध्यापक यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र या विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीसाठी सुवर्णपदक स्थापित केले आहे. त्यासाठी दोन लाख रुपयांचा धनादेश कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर,प्रा.ए.बी.चौधरी तसेच डॉ.डी.ए.पाटील, डॉ.अजय पाटील, डॉ.वाय.ए.अहिरराव, प्राचार्य एम.व्ही.पाटील, डॉ.प्रविण पाटील, डॉ.शुभांगी पवार, डॉ.एस.के.तायडे, डॉ.एस.बी.खैरनार, डॉ.सी.आर.पाटील, डॉ.एस.आर.क्षीरसागर आदी उपस्थित होते. अलिकडेच विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाई चौधरी नाव देण्यात आले असून या अनुषंगाने प्रेरीत होऊन विद्यार्थिनींना विशेष प्रेरणा देण्यासाठी हे सुवर्णपदक स्थापित करण्यात आले आहे.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक :24 सप्टेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी